SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
PHONE: EPABX- 0091-0231-2609000 Director Office: 0231-2609068
On Exam .: Section: 0231-2609121 Fax : 0091-0231-2690655
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004 महाराष्ट्र
Estd;1962
NAAC"A++"Grade Website: E- mail : coe@ unishivaji.ac.in./ Oe-3 exam@ unishivaji.ac.in.

---

जा.क्र. / शिवाजी वि. / परीक्षा / १२ दि. **११ एप्रिल २०२१**

# परिपत्रक

## अत्यंत तातडीचे आणि महत्वाचे

**संदर्भ –1) परीक्षा विभागाचे परिपत्रक जा. क्रं. परीक्षक नियुक्ती / चव्हाण / 399 A दिनांक 5 एप्रिल 2021**
**2) परीक्षा विभागाचे परिपत्रक जा. क्रं. शिवाजी वि / ऑनपरीक्षा / 912 दिनांक 7 एप्रिल 2021**

उपरोक्त संदर्भ क्रं. १ येथील परिपत्रकान्वये शिवाजी विद्यापीठामार्फत घेण्यात येणाऱ्या दिनांक ६ एप्रिल ते १२ एप्रिल २०२१ या कालावधीतील परीक्षा कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या कारणास्तव स्थगित करण्यात आलेल्या होत्या.

संदर्भ क्रमांक २ येथील परिपत्रकान्वये ज्या विद्यार्थ्यानी ऑफलाइन परीक्षेचा पर्याय निवडलेला आहे त्यांना ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देण्यासाठी लिंक उपलब्ध करून देण्यात आलेली होती. तसेच जे विद्यार्थी अपवादात्मक परिस्थितीनुसार ऑफलाइन पद्धतीनेच परीक्षा देणार आहेत अशा विद्यार्थ्यांची परीक्षा कोविड प्रादुर्भाव कमी झालेनंतर यथावकाश घेण्यात येईल आणि याबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल असे कळविण्यात आलेले होते.

**उपरोक्त दोन्ही परिपत्रकांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की,**

१) यापूर्वी घोषित केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे ज्या परीक्षा दिनाक १५ एप्रिल २०२१ पासून होणार आहेत, त्या परीक्षा **(फक्त ऑनलाइन पद्धतीने पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या)** ऑनलाइन पद्धतीनेच होतील. जे विद्यार्थी ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देणार आहेत त्यांची परीक्षा दिनांक १५ एप्रिल २०२१ पासून होणार नाही. ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे वेळापत्रक कोविड-१९ चा प्रादुर्भाव कमी झालेनंतर स्वतंत्रपणे घोषित करण्यात येईल.

२) तसेच संदर्भ क्रं. २ नुसार दिनांक ६ एप्रिल ते १२ एप्रिल २०२१ या कालावधीतील कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या कारणास्तव स्थगित करण्यात आलेल्या परीक्षांचे **( फक्त जे विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देणार आहेत त्यांच्यासाठी)** सुधारित वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले असून विद्यार्थ्यांनी त्याची नोंद घ्यावी व त्यानुसार ऑनलाइन पद्धतीने परिक्षा द्यावी.

**आपला विश्वासू,**

**प्र. संचालक**
**परीक्षा आणि मूल्यमापन मंडळ**